

Principal Dr. D.S. Sutrave and Dr. Valsange A.B. as a Chief Guest at Bharati Vidyapeeth in the occasion of Research book publication 05/ 06/ 2024



सकाळ

# संशोधन हा शैक्षणिक संस्थेचा अविभाज्य घटक

## डॉ. दत्तात्रय सुत्रावे ; शोधनिबंध पुस्तिकेचे प्रकाशन

**सोलापूर, ता. ६ :** संशोधन हा शैक्षणिक संस्थांचा अविभाज्य घटक असल्याचे मत, शिवदारे आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय सुत्रावे यांनी येथे केले.

अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड सोशल सायन्सेस, सोलापूर येथे प्राध्यापकांनी प्रतिष्ठित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पुस्तिकेमध्ये लिहिलेल्या शोधनिबंधाचे रिसर्च वोल्युम प्रकाशनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

सुत्रावे म्हणाले, फक्त विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करणे हेच शैक्षणिक संस्थेचे काम नसून, विविध क्षेत्रांमध्ये संशोधन करणे ही काळाची गरज आहे. ए.आय.सी.टी.ई, यू.जी.सी., एन.आय.आर.एफ. अशा केंद्र सरकारच्या संस्थांनी सुद्धा रिसर्चला अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे. त्यामुळे यापुढे प्राध्यापकांनी विविध विषयांमध्ये संशोधन करणे गरजेचे बनलेले आहे.



**सोलापूर :** येथील अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये पुस्तिका प्रकाशन प्रसंगी मान्यवर.

यावेळी संचालक प्रा. डॉ. एस. बी. सावंत यांनी इन्स्टिट्यूटमधील प्राध्यापकांनी मागील पाच वर्षात केलेल्या संशोधनाचा आढावा घेतला. त्याचप्रमाणे प्राध्यापकांमध्ये संशोधनाविषयी गोडी निर्माण व्हावी यासाठी इन्स्टिट्यूटतर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

उपप्राचार्य डॉ. पी. पी कोठारी यांनी सूत्रसंचालन केले. एमबीए विभागप्रमुख प्रा. सी. आर. सूर्यवंशी यांनी आभार मानले. हे रिसर्च वोल्युम तयार करण्यासाठी एमसीए विभाग प्रमुख प्रा. डॉ. एम के पाटील यांनी परिश्रम घेतले.

Solapur, Solapur-Today
07/07/2024 Page No. 2